# एम. जी. एम. अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय व कृषि विज्ञान केंद्रातर्फे “सीताफळ लागवड तंत्रज्ञान” सत्राचे यशस्वी आयोजन

महात्मा गांधी मिशन कृषिविद्याशाखा परिसर, एम. जी. एम. हिल्स, गांधेली येथे संपन्न होत असलेल्या कृषि तंत्रज्ञान महोत्सवात दि. २१ सप्टें. २०१८ रोजी “सीताफळ लागवड तंत्रज्ञान” सत्राचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील सीताफळ बागायतदारांसोबातच इतर शेतकरी या सत्रास मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विषयतज्ञ म्हणून अंबाजोगाई येथील सीताफळ संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. गोविंद मुंढे यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. मुंढे यांनी सीताफळाच्या लागवडीसाठी आवश्यक तंत्रज्ञान, जमिनीची पोत, सुधारित वाण आणि कीडव्यवस्थापन यावर प्रकाश टाकला. सत्रास कृषिभूषण श्री. सुदामअप्पा सोळुंके आणि श्री. द्वारकाभाऊ पाथ्रीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान एम. जी. एम. चे कृषि शिक्षण संचालक डॉ. राजेंदर रेड्डी यांनी भूषवले तर प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. निलेश म्हस्के यांनी प्रतीवेदीय भाषणातून आजच्या विषयाचे महत्व नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अन्न्तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र काळे यांनी केले आणि प्रा. गणेश राउत यांनी सूत्रसंचालक म्हणून काम पाहिले. कृषि विज्ञान केंद्राच्या कृषितज्ञांनी, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी तसेच कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी योगदान दिले.

